बा.व्हा.
3633
१९७१

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल-वाङमय
दा. क्र. १४०४८



# संध्या

IRBK-0114048

शुभा लिमये

वा. क्रं. ११०४८.
वा. वाङ्मय
७७०९२
३०७७९
३८०३३



१

लालचुटुक रंग छान
कागदी झगा भलती शान
याची चव लागते टॉप
ओळखा बरे हा......


म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र ११०४८ नों दि ........
वि. ३ वा वा ... क्र. ........ ४

२

पिवळे रूप पिवळा थाट
सूर्याची हे बघते वाट
सूर्य जाताच होते मल्ूल
ओळखा बरे हे...

कधी नाटक कधी गाणी
अखंड याची शिणते वाणी
चऱ्हाट दिवसभर ऐका हो
ओळखा बरे हा.. ...

रंगीत कपडे करतो सलाम
आभाळामधे फिरतो गुलाम
जो हा उखाणा जिंकील त्याला
देईन मूठभर काजू नि बदाम



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७७०९२ ... वि. बा. वाङ्मय.
क्रमांक ... नोंद दि. ...
IRBK-0114048

५

इटुकली मिटुकली पराक्रम फार
डोळ्यातून लागली पाण्याची धार
जीभ करते हायहाय
सांगा हिचे नाव काय?

६

सुंदर रूप मिजास खूप राणी म्हणशिल काय
जलद गती चपल अती हरीण म्हणशिल काय
चार पाय डोके नाय अशी ही म्हाळसा बाय
ओळख हिचे नाव चटकन् विचार करतोस काय

७

लाल डगला करतो ठणाणा
गर्दीत घुसून जातो सणाणा
संकटसमयी शूर हा राणा
पाहू बरं कोण ओळखतो उखाणा

८

गोल गोल याचा चेहरा
खणखण आवाज छान
चकपक याचे अंग
भलती याची शान
ओळख बरे हा उखाणा
नाहीतर उपटीन कान



९

दांडीवरती झोका
मजेत मारतो हाका
हा उखाणा जिंका नाहीतर
अक्कल गहाण टाका

११

जोडीने फिरतात जोडीने लपतात
जोडीने हसतात जोडीने रुसतात
दोन भाऊ जुळे खट्याळ नि भोळे
ओळखा बरे हे तर......



१०

फिरतो कसा गरागरा
वारा येतो भराभरा
याला परंतु नाहीत पाय
अशा वस्तूचे नाव काय ?



१२

डोंगररानात नि दऱ्याखोऱ्यात
गुणगुणत असते आपल्याच तोऱ्यात
सदा हिची घाई थांबत नाही कधी
ओळखा बरे ही तर......

१३

लाल मखमली पेटी
बत्तीस मोती आत
ओळखा बरे चटकन्
हे तर आपले......

१४

जिकडे तिकडे भटक
नाही कशाची अटक
घरी दारी रस्त्यावरती
याच्या आवाजाची चटक

१५

दात आहे पण खात नाही
जंगलात फिरते पण हरवत नाही



१६


चकणा डोळा वाकडी मान
असे याचे दिसते ध्यान
वेष आहे काळा बावळा
उखाणा ओळखील त्याला एक आवळा

१७

लांब कान तुरतुर चाल
लुकलुक डोळे मणी लाल
मऊ मऊ अंग कापूस जसा
ओळखा बरे हा तर......

१८

चिटर फटक चिटर फटक
घर बांधतो चटक पटक
झाडावरती याची नक्षी
ओळखा बरे हा......



१९

बोलतो आणि बोलवतो
ऐकतो आणि ऐकवतो
आकडे गरगर फिरवतो
खोडकर सदा मिरवतो
ओळखा बरे हा कोण
अरे हा तर......

२०

दोन कानांच्या काकूबाई
यांना ऐकू येत नाही

२१

सुळसुळ वाळू पाण्यात खेळतो
खडकाआड जाउन लोळतो
नेहमीच कसा चालतो वाकडा
ओळखा बरे हा तर...

२२

गारेगार रंग छान
काडीने पिण्यात केवढी शान




२३

जळत राहते सुगंध देते
पंगतीला पूजेला शोभा येते




२४

कळ्याफुलांचा पापा घेऊन
द्‌वाचे थेंब टाकते पिउन
पिवळे आहे सोन्याहून
ओळखा बरे हे तर...

२५

जातो कुठून येतो कुठून
फुलांचे वास नेतो लुटून
लहरी याचा कारभार सारा
ओळखा बरे हा तर......





२६

गुलाबी ओढणी हिरवी सलवार
मोत्यांची माळ गळ्यात अलवार
गोड गोड लाजते कोण ही खुळी
ओळखा बरे ही.........

२७


चुरचुर बोलते नाना चवी
खमंग वस्तू हिला हवी
स्वभाव मुळीच नाही गरीब
ओळखा बरे ही तर......

२८

आगदाणी बागदाणी
आमराईत पंचम लावला कोणी
ओळखा बरे ही स्वरराणी

२९

अशी नार दिमाखदार
खणखणीत आवाज चपळ फार





३०

पंख मिरवते पण पक्षी नाही
गडगडाट करते पण तोफ नाही
पोटात माणसे पण राक्षस नाही
आभाळात जाते खूप खूप उंच
उखाणा ओळखील त्याला आख्खी चिंच

३१

आटपाट नगर
तळ्यात एक मगर

३२

पावडर फासते साऱ्या अंगा
अशा नारीचे नाव सांगा

३३

पातळ आहे पाणी नव्हे
शब्द प्रसवते वाणी नव्हे

३४

अत्तर कत्तर पान
सणासुदीचा मान
चंद्रकोर इवली जणू
चव गोड छान

३५

नव्हे फळ नव्हे फूल
सुवासाने घालते भूल

३६

अंग ढालीचं
डोकं पालीचं

३७


लुकलुक बघते चुकचुक करते
छतावरून सर्रकन् टुकटुक करते

३८

अगड बगड नाही दगड
पोटामधे पाणी रगड

३९

सुंदर रूप सुंदर वास
काट्यांचा पण आहे त्रास
फुलांमधे भलता रुबाब
ओळखा बरे हा तर......



४०


गारेगार
आवडते फार
जिभेवरती
विरघळले पार

४१

घम घम घमाटा
भलता यांचा झपाटा
फाड फाड धडाड धूम
जिकडे तिकडे धामधूम

४२

धनुष्य आहे पण नाही बाण
सात रंगांची सुंदर खाण
बघता बघता होते अदृश्य
ओळखा बरे हे......



४३

विलायतेच्या आगबोटीतून
आली गोरी मड्डम
तिच्याबरोबर आले म्हणून
याचीही फार टमटम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ८८०९२ वि. बालवाङ्मय
क्रमांक ३८३३ नोंद दि. ३०।८।८७



४४

काठी घ्या नि लावा गळ
पाण्यात टाकून शोधा तळ
सुळकन् जातो वाट बघत बसा
ओळखा बरे हा तर......



४५

दिवाळीच्या आनंदात घालतात भर
प्रकाशपुष्पांचे उधळतात सर
पेटवल्या म्हणजे मजाच मजा
ओळखा बरे या...



४८

चार जिन्नस चाळवले
एकमेकात मिसळले
तोंडाला कसं सुटतंय् पाणी
हिचं नाव ओळखेल का कुणी ?

४७

नक्कल करते पण नाही अक्कल
जोडीनेच नेहमी फिरते दुक्कल
जो हा उखाणा जिंकील त्याला
देईन एक नारळाचं भक्कल




४६

एवढेसे कारटे
सळो की पळो करते
गुपचूप येउन
अंगावरती चरते

४९

अलिकडे धागा
पलिकडे धागा
करामत केवढी
कोनाड्यात बघा



५०


झुक झुक झोळणा
आकाशात पाळणा
ढगांच्या दुलईत
लाडका राणा

५१

फत्तराचे काळीज उभा हा खडा
मुक्याने सोसतो तुटला जरी कडा
वाऱ्यावादळाची याला नाही मुर्वत
ओळखा बरे हा तर......

५२

चांदीचा पोशाख चमकदार
ऐट केवढी, चटक फार
हवीहवीशी याची भेट
ओळखा बरे हे......



५३

पाठीवर घर नि पोटात पाय
सांग बरं मला तू ओळखलंस काय?

५४

फोटोहून खरे चित्राहून बरे
उखाणा ओळखील त्याला फणसाचे गरे

५५


लांबलचक विळविळीत
भाजी कशी मिळमिळीत
रूप नाही गुण उठवळ
ओळखा बरे हे तर......

५६

साता समुद्रापलीकडे समारंभ झाला
आपापल्या घरात लोकांनी पाहिला

५७

कोवळी आणि ताजी
कोल्हा हिला राजी
चव हिची फाकडी
ओळखा बरे ही...





५८

आधी होता हिरवा
मग झाला लाल
सर्वांचा हा आवडता
किती खाऊन घ्याल ?

५९

एकेकाला धरून चापते
सगळ्यांनाच ही कापते
धारदार हिचा स्वभावच मुळी
ओळखा बरे ही तर......

६०

खुदकन् हसले त्याचे दात दिसले
रामाने पुसले : फळ हे कसले?

६१

हिरव्या मखमलीवर इवला मोतीदाणा
जो ओळखील उखाणा तो चतुर शहाणा



६२

वाट बघा डोळे लावून
गमतीजमती येते घेऊन
सर्वांशीच हिची गट्टी
ओळखा बरे ही तर...

६३

आट आट आटुकली
पाच पाच पिटुकली
हालतात आणि डोलतात
बरीच आहेत धिटुकली

६४

मी आणि बहीण माझी
पायपीट करून वाहतो ओझी
ओळखा नाहीतर मारिन टपला
अरे या तर आहेत......



६५

जितकी गोल तितकी खोल
खणखणीत हिचे बोल
शेपटी ओढली तर भांडणतंटा
ओळखा बरे ही तर......

६६


खण खण कुद्ळी मण मण माती
टण टण गोटे विरघळले हाती

६७

अलबत खलबत
तळ्यात गलबत

६८

टोलाबरोबर लावतो शर्यत
याची धाव कुंपणापर्यंत
रंग आहे काळा करडा
ओळखा बरे हा तर...








६९

जमिनीवर सरपटते नागीण नव्हे
धूर सोडते चिमणी नव्हे
किंकाळी फोडते राक्षसीण नव्हे

७०

पाटावर बसली तेल लावताना हसली
तळ्यावर गेली स्नान करताना दिसली
तेव्हापासून रुसली गाल फुगवुन बसली





७१

निळा जांभळा लाल
रंग फासतात खुशाल
कधी आपसात टक्कर
गडगडाट घनचक्कर
दंगा बघतं सारं जग
ओळखा बरं हे तर......

७२


घराची स्वच्छता नेहमी जपते
कमरेत वाकून ही फार खपते
कोपऱ्यात उभी कामसू गुणी
ओळखा बरे ही......

७३

पाने खूप पण नाही झाड
कधी रोड तर कधी जाड
याच्यापुढे लवते मस्तक
ओळखा बरे हे तर......

७४

गोल गरगरीत वाटोळा
स्वभाव गोड साधाभोळा
डब्यामधून गुपचुप काढू
ओळखा बरे हा तर...



किल्ली घ्या नि उघडा दार
एकदम होशियार
सगळा उत्तर खजिना आहे
आत नंबरवार

७५

आज मी गंमत पाहिली
काळोखात चित्रे धावली
पोराथोरांची करमणूक झाली

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क. १२०४८ नों दि ........
दि.
ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
66092
3633

१ लॉलिपॉप
२ सूर्यफूल
३ रेडिओ
४ पतंग
५ मिरची
६ मोटार
७ आगीचा बंब
८ चांदीचे नाणे
९ पोपट
१० पंखा
११ डोळे
१२ नदी
१३ दात
१४ ट्रान्झिस्टर
१५ फणी
१६ कावळा
१७ ससा
१८ सुतारपक्षी
१९ टेलिफोन
२० कढई
२१ खेकडा
२२ ऑरेंज
२३ उदबत्ती
२४ ऊन
२५ वारा
२६ गुलाबकळी
२७ जीभ
२८ कोकिळा
२९ सायकल
३० बोइंग
३१ आमटीतली शेवग्याची शेंग
३२ पिठाची गिरणी
३३ शाई
३४ लवंग
३५ अत्तर
३६ कासव
३७ पाल
३८ नारळ
३९ गुलाब
४० आइस्क्रीम
४१ फटाके
४२ इंद्रधनुष्य
४३ बबलगम
४४ मासा
४५ फुलबाजा
४६ ढेकूण
४७ सावली
४८ भेळ
४९ कोळ्याचे जाळे
५० चांदोबा
५१ पर्वत
५२ चॉकलेट
५३ गोगलगाय
५४ आरशातले प्रतिबिंब
५५ पडवळ
५६ टेलिव्हिजन
५७ काकडी
५८ टोमॅटो
५९ विळी
६० सीताफळ
६१ दवाबिंदू
६२ सुट्टी
६३ बोटे
६४ चपला
६५ घंटा
६६ गारा
६७ भजे
६८ सरडा
६९ आगगाडी
७० पुरी
७१ ढग
७२ केरसुणी
७३ पुस्तक
७४ लाडू
७५ सिनेमा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
IRBK-0114048